जा. क्र.८९ /आर/का-२(८)/अकृषक/२०२०

कायालय कायकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग
सिव्हील लाईन्स , वर्धा -४४२००१
(फोन नं. ०७१५२- २४२७९२)
ई-मेल -wardha.ee@mahapwd.com
दिनांक - १५.९.२०२०

प्रति,

उपविभागीय अधिकारी ,
वर्धा,

**विषय :- कृषीक जमिनीचा उपयोग अकृषीक निवासी वापरांसाठी करण्याबाबत.**
**मौजा-तळेगाव(टा),सर्व्हे नं.१ आराजी-१.१३हे.आर. व १७३ आराजी-१.१३ हे.आर.एकुण आराजी २.२६ हे.आर.जमिनीस निवासी प्रयोजनार्थ ता. जि.वर्धा.**

**संदर्भ :-** १. आपले कार्यालयीन पत्र क्र.सिर/अकृषक/उविअ/कावी-४४७९/२०१९ दिनांक:-. २७.०६.२०१९.
२. उपविभागीय अभियंता,सा.बां. उपविभाग क्र.२ वर्धा यांचे पत्र क्र.१०५१/तां/२०१९ दिनांक २१.१२.२०१९.

संदर्भीय पत्र क्र.१ चे पत्रान्वये अर्जदार-श्री.सुधाकर पांडुरंग साटोणे रा.बोरगाव (मेघे) ता.जि.वर्धा यांनी मौजा-तळेगाव(टा) येथील **सर्व्हे नं.१ आराजी-१.१३हे.आर. व १७३ आराजी-१.१३ हे.आर.एकुण आराजी २.२६ हे.आर.**.या जागेचे कृषक जमीनीस अकृषक **निवासी** वापराकरीता या कार्यालयाकडून ना-हरकत अभिप्रायाची मागणी करण्यात आली आहे.

उपविभागीय अभियंता,सा.बां. उपविभाग क्र.२ वर्धा,यांनी सदर जागेची मौका पाहणी केलेली असून, प्रस्तावित जागा ही सुलतानपुर-तळेगाव(टा.)-ऐकुर्ली रस्ता **(प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१९)** या रस्त्यालगत अनागरी भागात आहे. दिनांक ९.३.२००१ च्या शासन निर्णय क्र.आरबीडी-१०८१/८७१/रस्ते-७, मध्ये विहीत केलेल्या पथकिनारवर्ती नियमाच्या अनुषंगाने **प्रमुख जिल्हा मार्ग** दर्जाच्या रस्त्यासाठी इमारत रेषा रस्तामध्यापासून ३०.०० मी. व नियंत्रण रेषा रस्ता मध्यापासून ४७.०० मीटर अंतरावर असते, **परंतु निवासी वापराकरीता इमारत रेषेच्या (रस्ता मध्यापासून ३०.०० मीटर) चे आत कोणतेही इमारतीचे पक्के बांधकाम करण्यात येवु नये.**

सदर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीच्या हद्दीतील जमिनीजवळ कोणत्याही प्रकारचे खाजगी बांधकाम अर्जदारास करावयाचे असल्यास महामार्ग प्राधिकारी यांची महामार्ग अधिनियम १९५५ च्या कलम ९ प्रमाणे, लेखी परवानगी घेणे अर्जदाराला बंधनकारक राहील. प्रस्तावित जागा ही अनागरी भागात येत असल्यामुळे संबंधीत **ग्रामपंचायत** यांची परवानगी घेणे बंधनकारक राहील. ग्रामपंचायत – **तळेगाव(टा.)** यांची नव्याने ना-हरकत घेण्यात यावी.

सदर कलम ९ प्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी प्राप्त केल्यावर, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ नुसार नियोजन प्राधिकरणाची परवानगी घेणे सुध्दा अर्जदारास बंधनकारक राहील. वरील विभागाची परवानगी अर्जदाराने प्राप्त न केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या (MRTP Act) कलम ५२, ५३, ५४, ५५, ५६ व ५७ प्रमाणे बांधकाम काढण्यात येईल, व सदर खर्चाची वसूली अर्जदाराकडुनच करण्यात येईल.

रस्ते विकास योजना-२००१-२०२१ नुसार प्रस्तावित जागेत या विभागाचा आज कुठलाही प्रस्ताव प्रस्तावित नसून कोणतीही योजना नाही. तथापी, इतर प्रयोजनाकरीता सदर जमिनीची शासनास केंव्हाही आवश्यक्ता भासल्यास सहजरित्या अधिगृहीत (Without dispute) करण्याचा अधिकार शासनास राहील.

**सदर भुखंड रस्त्यालगत असल्यामुळे रस्त्याला समांतर पोचमार्गाचे बांधकाम करावे लागेल.** सदर रस्ता **(प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१९)** चे उंची पेक्षा ३० से.मी. ने कमी असावी. तसेच त्यावर आवश्यक त्या व्यासाचे मोरीचे (C.D. Works) चे बांधकाम स्वखर्चाने करावे लागेल.

प्रस्तावित जागेत कोणतेही बांधकाम नियमास अनुसरुन असावे व शासकीय जागेत/हदीत अतिक्रमण करू नये. अन्यथा असे बांधकाम कोणतीही पुर्व सुचना न देता पाडण्यात येईल.

**इमारत रेषेच्या** आत कोणतेही बांधकाम केल्यास पुर्वसूचना न देता काढण्यात येईल व काढण्याकरीता येणारा खर्च संबंधीताकडून वसूल करण्यात येईल.

प्रस्तावित जागेतील बांधकामा व्यतिरिक्त सांडपाण्याची स्वतंत्र व्यवस्था करावी व रस्त्याच्या शासकीय जागेत सांडपाणी साचून राहणार नाही यांची दक्षता घ्यावी.

सदरची जागा हि प्रमुख जिल्हा मार्गालगत असल्याकारणाने सदरच्या जागेस जाण्याकरीता अर्जदारास समांतर १२.०० मी.रुंदीचा सेवा पथ तयार करणे आवश्यक राहील.पोचमार्गाकरीता संबंधीत खात्याची स्वतंत्र वेगळी परवानगी घ्यावी लागेल.
रस्ता हददीत वाहतुकीस अडथळा आणि रस्त्यास नुकसान होणार नाही, याची दक्षता घ्यावी लागेल.

देण्यात येणारे प्रमाणपत्र केवळ अकृषक वापराकरिताच **निवासी** प्रयोजनार्थ वैध राहील. या व्यतिरिक्त इतर कोणतेही प्रयोजनार्थ नाही व अर्जदाराने सदरहू मालमत्ता इतर कोणालाही विकल्यास हया सर्व अटी कायम राहील अन्यथा सदरहू नाहरकत रद्द ठरविण्यात येईल.

वरील पैकी सर्व अटी मान्य असल्याचे अर्जदाराकडून रु.१००/- च्या स्टॅम्प पेपर वर लिहून घ्यावे व सदर स्टॅम्प पेपरची साक्षांकीत प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी. अन्यथा हे ना हरकत प्रमाणपत्र रद्द समजण्यात येईल.

**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**वर्धा.**

**प्रतिलीपीः-** १.उपविभागीय अभियंता,सा.बां. उपविभाग क्र.२ वर्धा यांना त्यांचे पत्र क्र.१०५१/तां./२०१९ दिनांक २१.१२.२०१९ च्या अनुषंगाने योग्य अग्रेषित.
२.सचिव, ग्रामपंचायत तळेगाव(टा.),ता. वर्धा जि.वर्धा यांना माहितीसाठी रवाना.



Scanned with CamScanner